संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवा काळ

।। न मे भक्त प्रणश्यति ।।

# अर्थसंकल्पातही बेरोजगारीवर मौन

**एकीकडे** देशाचा अर्थसंकल्प सादर होत असताना त्याच्या पूर्वसंध्येला देशातील बेरोजगारीमध्ये अभूतपूर्व वाढ झाल्याचा निष्कर्ष समोर आला आहे. केंद्राच्या सांख्यिकी आणि कार्यक्रम अंमलबजावणी मंत्रालयाच्या अंतर्गत येणाऱ्या राष्ट्रीय नमुना सर्वेक्षणातून केवळ सहा टक्के असलेला बेरोजगारीचा दर जवळपास सत्तावीस टक्क्यांपर्यंत पोहचल्याचे या अहवालातून समोर आले आहे. याचा अर्थ गेल्या चार वर्षात सादर झालेल्या अर्थसंकल्पांमधूनही बेरोजगारी कमी करण्यात कोणतेच ठोस प्रयत्न झालेले नाहीत. यावर आपोआप शिक्कामोर्तब होते. प्रामुख्याने नोटाबंदीनंतर बेरोजगारीची समस्या अधिक तीव्रपणाने समोर आली. शिवाय गेल्या दोन वर्षामध्ये औद्योगिक उत्पादनात मोठी घट झाल्याचे नोंदले गेले. सरकारने मोठ्या प्रमाणावर परदेशी गुंतवणूक होत असल्याचे सांगितले असले तरीदेखील त्या गुंतवणुकीतून देशातला रोजगार मात्र वाढू शकला नाही. सर्वात गंभीर बाब अशी की सरकारच्याच अधिकृत संस्थेने ही धक्कादायक आकडेवारी दिली. आणि हा अहवाल दोन महिन्यापूर्वीच सरकारला सादरही झाला होता. परंतु त्याची कोणतीही दखल घेतली गेलेली नाही. उलट तो अहवाल दाबून ठेवला गेला. आश्चर्याची गोष्ट अशी की देशातील कोट्यवधी तरुणांचा रोजगाराचा गंभीर प्रश्न उपस्थित केला असताना यावेळच्या अंदाजपत्रकातही बेरोजगारीच्या प्रश्नावर सरकारने मौन बाळगलेले दिसून येते. निवडणुका डोळ्यासमोर ठेवून हा अर्थसंकल्प सादर केला असूनही देशातील बेरोजगारांच्या तोंडाला पाने पुसण्याचाच प्रकार झाला आहे. खरे तर सर्वाधिक युवा लोकसंख्या असलेल्या देशात युवकांच्या रोजगारीला अंदाजपत्रकातही महत्व मिळू नये. म्हणजेच त्यांच्या जखमेवर मीठाचे पाणी शिंपडण्याचाच प्रकार ठरतो. बेरोजगारांची मते हवी असतात. पण त्यांच्या समस्या सोडवण्यासाठी सरकारला वेळ नाही. देशातील तब्बल दहा कोटी तरुण आज बेरोजगार आहेत. ही संख्या थोडीथोडकी नाही. सरकारने त्याचा अर्थव्यवस्थेशी किंवा एकूणच अर्थकारणाशीही संबंध येतो. ही समस्या केवळ बेरोजगारांपुरतीच मर्यादित आहे आणि त्याचा देशाच्या अर्थकारणावर किंवा देशातल्या इतर कोणत्याही घटकावर परिणाम होत नाही. असेही सरकारला वाटत असावे.

### उच्चांक असूनही..........

दोन महिन्यापूर्वी बेरोजगारीविषयक हा अहवाल सरकारला सादर झाला होता. त्याचा नीट विचार झाला असता तर या अर्थसंकल्पात त्याची तितक्याच आस्थेने दखल घेतली गेली असती. बेरोजगारांना नोकरी देणे शक्य नसेल किंवा रोजगार देता येत नसेल बेरोजगारीचा भत्ता तरी दिला गेला पाहिजे. काँग्रेस अध्यक्ष राहुल गांधी यांनी काही दिवसापूर्वी बेरोजगारांना भत्ता दिला गेला पाहिजे. अशी मागणी केली होती. एवढेच नव्हे तर देशातील सर्वच गरीबांना एका विशिष्ट रकमेपर्यंत आर्थिक साहाय्य द्यावे अशीही मागणी केली. त्यांच्या या मागणीचे तीव्र पडसाद राजकीय क्षेत्रात उमटले होते. एवढेच नव्हे तर सर्वसामान्य वर्गातून गरीबांना आर्थिक मदत देण्याची काँग्रेसची तयारी वैशिष्ट्यपूर्ण असल्याच्या प्रतिक्रियाही व्यक्त झाल्या. कदाचित म्हणूनच यावेळच्या अर्थसंकल्पात शेतकऱ्यांना वर्षाकाठी सहा हजार रुपये आर्थिक साहाय्य देण्याची तसेच असंघटित कामगारांना निवृत्तीवेतन देण्याची घोषणा करणे सरकारला भाग पडते. याचा अर्थ देशातील सामान्य माणसाच्या भावना काय स्वरुपाच्या आहेत, याचा अंदाज येतो. लोकांना विशेषतः जे पगारदार नाहीत. अशांना सरकारकडून विशिष्ट प्रकारच्या हमीवेतनाची खूप मोठी अपेक्षा आहे. ती या ना त्या मार्गाने पूर्ण झाली तर लोकांना त्याचा निश्चितच दिलासा मिळू शकतो. म्हणजेच सामान्य माणसाला सध्या मिळत असलेले वेतन किंवा त्याचे उत्पन्न पुरेसे वाटत नाही. एवढेच नव्हे तर बेरोजगार आहे त्याला तर अशा थेट मदतीची खूपच आवश्यकता आहे. परंतु नेमक्या याच गोष्टीकडे सरकारने अजूनही लक्ष दिले नाही. दरवर्षी सरकारला आर्थिक धोरण किंवा समाजातल्या प्रत्येक घटकांना आश्वस्त करण्याचे काम ज्या अंदाजपत्रकातून केले जाते त्यामध्येसुध्दा जर या समाजातल्या महत्वाच्या घटकाची हेळसांड होत असेल तर ते तितकेच मोठे सामाजिक दुर्दैव म्हणावे लागेल. हा केवळ योगायोगाचा भाग जरी असला तरी अर्थसंकल्पापूर्वीच या मुद्दाचा विचार होणे जास्त संयुक्तिक ठरले असते.

### बेरोजगारीचा ज्वालामुखी

अर्थसंकल्प हा केवळ एका प्रशासकीय किंवा राज्यकारभारातला औपचारिक भाग नाही. भारतासारखे लोकशाही प्रधान राष्ट्र आणि या देशातील सव्वाशे कोटी लोकांच्या अपेक्षा ज्यामधून परावर्तीत होत असतात. त्यामध्ये निम्म्यापेक्षा जास्त संख्या असलेल्या युवकांना टाळलं जात असेल आणि त्यातही त्यांच्या रोजगारविषयक अपेक्षांची पूर्तता होत नसेल तर ही गोष्ट अधिक चिंताजनक ठरते आणि आता तर गेल्या पंचेचाळीस वर्षातला बेरोजगारीचा उच्चांक गाठला असताना चाळीस टक्के तरुणांना चार टक्केसुध्दा दिलासा मिळू शकलेला नाही. यासंदर्भात सरकार जर काही करू इच्छित नसेल तर या देशातील सामाजिक संघटनांनी अर्थतज्ज्ञांनी, विचारवंतांनीसुध्दा या संदर्भात विचार मांडले पाहिजे. किंबहुना सरकारचे या महत्वाच्या समस्येकडे लक्ष वेधले पाहिजे. मोठ्या संख्येने देशामध्ये वाढणारा हा बेरोजगार म्हणजे समाजात मोठी अस्वस्थता असल्याचे ते लक्षण ठरते. ही अस्वस्थता प्रदीर्घ काळ जरी राहिली तर त्याचे केव्हाही असंतोषामध्ये परिवर्तन होऊ शकते. बेरोजगारीच्या या ज्वालामुखीचा केव्हा आणि कसा स्फोट होईल हे सांगता येत नाही. सरकार जर त्याचीच वाट पाहात असेल तर ती समाजातल्या एका मोठ्या घटकाशी खेळ करीत आहे असेच म्हणावे लागेल. ज्याअर्थी दोन महिन्यापूर्वी हा अहवाल मिळूनही सरकारने तो सार्वजनिक करण्याऐवजी तो दाबून ठेवण्याचा निर्णय घेतला. म्हणजेच या बेरोजगार घटकाची मुस्कटदाबी करण्याचाच तो प्रकार म्हणावा लागतो. पंचेचाळीस वर्षातला हा उच्चांक म्हटल्यानंतर अहवाल मिळाल्यानंतरच्या पंचेचाळीस दिवसात त्यावर युध्दपातळीवर उपाययोजना करता आली असती.